विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाच्या
प्रतिपुर्तीच्या मंजुरीबाबत.
प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व
मंजुरीच्या अधिकारात सुधारणा करणेबाबत..

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,

पी.ओ. कृषि नगर, अकोला (म.रा.)-४४४ १०४.

प्रशासकीय आदेश क्र.बीबीए/एमआर/२०२३

दिनांक २१ संप्टेंबर, २०२३

वाचा- १. विद्यापीठ आदेश क्र बीबीए/एमआर/२०१६ दिनांक २९.०७.२०१६
२. शासन निर्णय क्र वैखप्र-२०२२/प्र.क्र. १२०/राकावि-२ दिनांक १७.०१.२०२३
३. विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र काप/३८/२०२३ दि.१६.०५.२०२३
सुधारीत ठराव पुष्टीकरण दिनांक ०७/०८/२०२३

**प्रस्तावना :**

संदर्भ क्र १ चे विद्यापीठ आदेशानुसार विद्यापीठातील तसेच विद्यापीठाशी अनुदानित संलग्नीत महाविद्यालये व शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाचे देयकांचे प्रतिपुर्ती करीता मंजुरी देण्याचे अधिकार विनिर्दिष्ट करण्यात आले होते. तथापि संदर्भ क्र २ चे शासन निर्णयानुसार वैद्यकीय खर्चाचे देयकांचे प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना मंजुरी देण्याचे अधिकारामध्ये बदल करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र ३ वरील विद्यापीठ कार्यकारी परिषद ठरावामध्ये वैद्यकीय खर्चाचे देयकांचे प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना मंजुरी देण्याचे अधिकारामध्ये बदल करण्यास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे प्रशासकीय आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## प्रशासकीय आदेश-

उपरोक्त प्रस्तावनेमध्ये नमुद पार्श्वभुमीवर असे आदेशित करण्यात येते की, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व विद्यापीठाशी अनुदानित संलग्नीत महाविद्यालये व शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाचे देयक प्रतिपुर्तीस मंजुरी देण्याचे सुधारीत वित्तीय अधिकारास खालील नमुद केल्याप्रमाणे मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सक्षम प्रधिकारी | पूर्वीचे अधिकार | सुधारीत अधिकार | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | संबधित कार्यालय प्रमुख | रू ७५,०००/- | रू १,००,०००/- | कार्यालय प्रमुख व्यतीरिक्त इतर कर्मचा-यांकरीता |
| २. | संबधित नियंत्रण अधिकारी | रू ७५,००१/- ते रू १,५०,०००/- | रू १,००,००१/- ते रू २,५०,०००/- | नियंत्रण अधिकारी व्यतीरिक्त इतर कर्मचा-यांकरीता |
| ३. | मा. कुलगुरू | रू १,५०,००१ ते रू ३,००,०००/- | रू २,५०,००१/- ते रू ५,००,०००/- | |
| ४. | मंत्रालयीन प्रशासकीय प्रमुख कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई | रू. ३,००,०००/- वरील प्रतिपुर्ती देयके | रू ५,००,००१/- वरील प्रतिपुर्ती देयके | |

तसेच प्रत्येक प्रकरणातील सर्व अधिकारी /कर्मचारी यांची रू ५,००,०००/- पेक्षा जास्त रक्कमेच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती देयके विद्यापीठाचे वित्त प्रशासनाच्या शिफारशीनुसार व मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने कुलसचिव कार्यालयामार्फत मंत्रालयीन प्रशासकीय प्रमुख कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे मंजुरीकरीता पाठविण्यात येतील.

जिल्हा शल्य चिकित्सक /सक्षम प्रधिकरणाव्दारे एकदा निश्चित केलेली प्रतिपुर्तीची रक्कम जर रू ५.०० लक्ष पेक्षा जास्त असेल तर कोणत्याही परिस्थितीत सदर प्रस्ताव मंजुरीकरीता संबधित मंत्रालय विभाग मुंबई यांचे मजुरी न घेण्याच्या उद्येशाने अधिकारी /कर्मचारी यांनी लेखी प्रमाणपत्राव्दारे प्रस्ताव विद्यापीठ स्तरावर पारीत करण्याकरीता रक्कम ५.०० लक्षाच्या मर्यादितील पारित करावा अशी विनंती केली तरी असा प्रस्ताव विद्यापीठ स्तरावर विचारात घेतला जाणार नाही प्रथम तो संबधित मंत्रालयीन विभाग, मुंबई येथे मंजुरीकरीता पाठविण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

तसेच या आदेशाव्दारे निर्देशित करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे कार्यालय प्रमुख, नियंत्रण अधिकारी यांच्या स्तरावर प्रकरणांना मंजुरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णया मधील तरतुदी काटेकोरपणे तपासून मंजुरी देण्याची जबाबदारी सक्षम प्रधिका-यांची राहील.

उपरोक्त आदेश विद्यापीठ हितार्थ निर्गमित करण्यात येत असून याची तात्काळ अंमलबजावनी करण्यात यावी.

उपरोक्त आदेश विद्यापीठाचे वित्त प्रशासन विभागाच्या सहमतीने व मा. कुलगुरूचे मंजुरीने निर्गमित करण्यांत येत आहे.

स्वा/-
कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

**प्रतिलिपी माहिती व उचित कार्यवाहीकरीता-:**

१. सचांलक, शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), डॉ.पंदेकृवि, अकोला.
२. संचालक संशोधन / विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
३. सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ------------------------------------------------
४. विभाग प्रमुख, (सर्व) ------------------------------------------------
५. सहयोगी अधिष्ठाता शिक्षण / निम्नशिक्षण डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला ------------------------------------------------
६. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, (सर्व) ------------------------------------------------
७. प्रभारी अधिकारी कृषि संशोधन केंद्र बुलढाणा ------------------------------------------------
८. वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषि विज्ञान केंद्र (सर्व) ------------------------------------------------
९. विद्यापीठ नियंत्रक, /विद्यापीठ ग्रंथपाल / विद्यापीठ अभियंता डॉ. पंदेकृवि, अकोला.
१०. ------------------------------------------------

**प्रतिलिपी-**

१.अधिदान व लेखाधिकारी, डॉ. पंदेकृवि, अकोला/ नागपुर
२. मा. कुलगुरू यांचे स्विय सहायक डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
३. शाखाधिकारी अ, ब, ई, म, ड कक्ष आस्थापना विभाग डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
४. ------------------------------------------------

कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

Order-M (I)